REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 7 | APRIL - 2019

आधुनिक मराठी साहित्यातील विविध प्रवाह उत्खनन–गौरी देशपांडे

प्रा. जगताप एस.एस.
एम.ए.एम.फिल, नेट, सेट, पी.एच.डी
(ॲपीयर मुंबई विद्यापीठ)
अे. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय,रविवार पेठ, सोलापूर.

प्रस्तावना

1960 नंतर मराठी साहित्य क्षेत्रात विविध वाङ्:मय प्रवाह उदयास आले. ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी साहित्य हे भारतीय संस्कृती आणि पाश्चात्य विचारप्रणाली यांच्या विचारसरणीतून निर्माण झाले आहे.

पाश्चिमात्य स्त्रीयांनी आपल्या हक्कासाठी लढे उभा केले, पुरूषांचे वर्चस्व दाखवून दिले. स्त्रीही माणूस आहे तीला मानव्यता मिळविण्यासाठी त्यांनी संघर्ष केला. भारतातही महात्मा ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ताराबाई शिंदे, राजाराम मोहनरॉय, लोकहितवादी, रानडे, आगरकर, कर्वे यांनीही स्त्री सुधारणेसाठी मौलीक योगदान दिले. स्त्रीयांना समानतेची वागणूक मिळावी त्यांच्या हक्काची त्यांना जाणवी करून दिली. त्यांचे एकूणच जीवन सुधारण्यासाठी स्वतःचे आयुष्य पणाला लावले. आजही स्त्रीस्वातंत्र्यासाठी हक्कासाठी स्त्रीयाचा संघर्ष, त्यांचा लढा चालूच आहे.

स्त्रीवादी म्हणजे काय ?

''स्त्रीवाद म्हणजे स्त्रीला आपल्या स्वत्वाची जाणीव होणे. तिला आपल्या व्यक्तिमत्वाचा अर्थ कळणे, तीला तिच्या अस्मितेचा सार्थ अभिमान वाटणे. तिला तिच्या माणूसपणाबद्दल आत्मीयता वाटणे, तिला तिचे हक्क–अधिकार कळणे, तिला तिच्या अवमुल्यनाची आणि शोषणाची जाणीव होणे. तीने आपल्या दडपल्या जाणाऱ्या स्वत्वासाठी संघर्षप्रवण होणे म्हणजे स्त्रीवाद होय''.

''स्त्रीवाद म्हणजे पुरूषापासून फारकत घेवून स्वतःचा सवता सुभा निर्माण करणे नव्हे, पण संस्कृतीच्या हजारो वर्षाच्या इतिहासाने बाईचे मानवपण नाकारून तिला जी पशुतुल्य अवस्था प्राप्त करून दिली, त्यातून बाहेर पडून आपले हक्क प्रस्थापित करून घेण्यासाठी निर्माण केलेले हे व्यासपीठ आहे. ''अश्विनी धोंगडे

''पुरूष व स्त्रीया यात विरोध आहे. स्त्रीया म्हणून एक विशिष्ट प्रकारची दडपणूक होते. संपत्ती व नोकरी यावर सत्ता असलेल्या व त्यामुळे सर्वसाधारण स्त्रीयांच्या परस्थितीपासून मुक्त असलेल्या वरिष्ट वर्गातील मुठभर स्त्रीयांखेरीज बाकी सर्व स्त्रीयांची स्त्री म्हणून दडपणूक होते.'' ––गेल ॲमव्हेट

''जहाल स्त्रीवादी शाखेचा उदय डाव्या विचारसरणीच्या क्रांतीकारी राजकरणातून झालेला दिसतो. स्त्रीयांच्या लैंगिकतेवर पुरूषांचे वर्चस्व हे लैंगिक राजकरण जहाल स्त्रीवादाने प्रकाशात आणले. पुरूषसत्तेने लिंगनिष्ठतेचे जे स्वाभावीकरण केले आहे. पुरूष स्त्रीयांकडे माणूस म्हणून न पहाता लैंगिक व पुननिर्मितीची सेवा देणारा घटक म्हणून पाहतात. ही पुरूषप्रधानतेची संकल्पना स्पष्ट केली आहे. अपत्यजन्म , संगोपन, विवाह, गृहकाम, वेश्याव्यवसाय, भिन्नलिंगी लैंगिकजीवन या सगळ्या लिंगनिष्ठ व्यवहाराला प्रश्नांकित केले आहे.'' –– शोभा पाटील.

''स्त्रीयांच्या हक्काची भूमिका घेणे म्हणजे स्त्रीवाद''–– विद्युत भागवत.

गौरी देशपांडे यांची ग्रंथसंपदा

गौरी देशपांडे यांनी नायिका प्रधान कथा, कादंबऱ्याची निर्मिती केली. या कथा आणि कादंबरी मधील जग उच्चमध्यमवर्गीय आहे. हे वैचारिक जग मांडले आहे.

'आहे हे असं आहे (1986) ह्या कथा संग्रहातील कथा अनेक नियतिकालिकांमधून 1970 ते 1980 या काळात प्रसिध्द झालेल्या आहेत. 'एकेक पान गळावया' हे पुस्तक मौज प्रकाशनाने 1980 मध्ये प्रकाशित केले. यात तीन लघुकादंबऱ्या समावेश आहे. त्यानंतर' तेरूओ' आणि 'काही दुरपर्यंत' (1985) निरगाठी' आणि ' चंद्रिके गं सारिके गं (1978), दुस्तर हा घाट' आणि 'थांग' (1989), 'मुक्काम' (1992) 'गोफ' (1999) उत्खनन (2002), विंचुर्णीचे धडे हे ललित गद्य (1996) एवढं साहित्य त्यांच्या नावावर आहे.

उत्खनन कादंबरीचा आशय

उत्खनन ही गौरी देशपांडे यांची शेवटची कादंबरी 2002 मध्ये मौज प्रकाशनाने प्रकाशित केली. अनंत, दुनिया–दयाल, बापू, अर्णव, जब्बार, तीर्थकर, अभया यांची कहाणी या कादंबरीत आहे.

दुनिया हे नाव जगावेगळं, पण जगाचेच नाव दुनियाच्या बापु आईनी दिलेले असले. दुनिया नावाबद्दल विचारते तेव्हा तिचे वडील बापू म्हणतात'' अग, आमची आधीची मुलं जन्मण्याअगोदरच दगावली, म्हणून मग मुलांचा विचार आम्ही सोडून दिला होता. पण तुझ्या वेळी आम्ही म्हणालो, 'हाती लागलं, तर हे मूल आपलं, नाही तर साऱ्या दुनियेतली अनाथ मुलं वाट बघताहेत आई–बापांची! आणि तू जन्मलीस, दुनियेसाठी पुढे गेलेले आमचे हात साजरे केलेस, म्हणून तू'दुनिया'

असे नावाबद्दल स्पष्टीकरण देतात. दुनियाला आपल्या नावाचे अप्रूप वाटते. साऱ्या दुनियेतल्या मुलांचे प्रातिनिधिक नाव होते म्हणून.

वयाच्या 17–18 व्या वर्षी अनंताचे आपल्यासारख कुठल्या तरी 'मध्यम' वर्गात फिट बसणाऱ्या बारीक–सारीक फरकांनी पण आपल्यासारख्या आईबापांनी वाढवलेल्या, कमीजास्त अभ्यास करून ठरलेल्या चार ध्येयांचा पाठपुरावा करणाऱ्या आसपासच्या मुलामुलींमध्ये जराही रस नसलेल्या मला अनंताच्या ठसठशीत वेगळेपणाचे आकर्षण वाटले ; आणि अर्थातच, त्याने मला त्याच्या वेगळ्या वाटेला न्यायचे की त्याला माझ्या रूळलेल्या वाटेवर आणायचे या चढाओढीत माझा स्पेशल पराभव झाला. असं दुनिया अनंतविषयी सांगते.
अनंताचे नाव तर अनंतनारायण असे आहे. दुनिया त्याला प्रश्न करते ''विद्यार्थी असताना अभ्यास नाही करायचा, तर काय करायच ? '' गाणी, ऐकायची, सिनेमा–नाटकं बघायची, डोंगरदऱ्यातून भटकायचं आणि रात्र रात्र निरर्थक चर्चा करण्यात जागवायची; इतकंच नाही, तर शक्य तितक्या वेळा निरर्थकपणे प्रेमातही पडायचं! असे तो बिनतोड उत्तर देतो. दुनियाही त्याच्या प्रेमात निरर्थकपणे पडल्याची कबुली देते. दुनियाच्या नावाचे अनंताला काहीच कौतुक नव्हते. तो गायब होतो कशासाठी तर–– 'फक्त जबाबदाऱ्या टाळण्यासाठी नव्हे, तर आपल्या आधीच नाकारलेल्या 'स्व' हा जो नवा धुमारा फुटतोय, तो नाकारण्यासाठी.

दुनियाच्या वडीलांची इच्छा असते की दुनियाने त्यांच्यासारखे 'शास्त्रज्ञ' बनावे, तर आईचया मनात असते की तीने लग्न करून संसार करावा, तिला भरपूर नातवंडे प्राप्त करून द्यावी इ.दुनिया मात्र पुरातत्वशास्त्र विषयाची प्राध्यापक होते.

दुनिया परदेशी शिक्षणासाठी जाते नेटाने काम–अभ्यास करत असते. लायब्ररी, पुस्तके–पेन, प्रोफेसर की तिची खोली. एवढेच कुणाशीही मैत्री वाढवीत नाही. अशा वगण्याला दुनियेची परिस्थिती कारण होती. परदेशात दुनिया नाईलाजाने, केवळ आपल्या वडीलांच्या हट्टखातर राहते. शक्य तितक्या लवकर प्रबंध पुर्ण करून मणीकडे परत जायचे असते. असा आई–बापूंवरच टाकलेली लहानगी मणी दुनियाला निकाराने परत खेचत होती.

दुनिया आपल्या वडीलांना (बापुंना) स्वतःच्या भयानक बातम्या सांगायच्या असतात–एकः काठावर पास झाल्यावर मी सायन्स सोडून आता आर्टसकडे वळणार ; दोन : मणीचा जीव माझ्या पोटात हालचाल करायला लागलाय ; आणि तीन : ते समजताच मणीचा बाप गायब झालेला आहे. कसेतरी, थरथर कापत दुनिया स्टडीरूमकडे जातात. दुनियाच्या साऱ्या घटना बातम्या वडीलांपर्यंत पोहचल्या होत्या. आणि त्या दोघांनी निर्णयही घेऊन टाकला होता.

बहकलेल्या मार्गाला दुनिया अनंतामुळे लागते, तिला परीक्षेत कमी मार्क्स पडतात. ती गरोदर राहते आई आणि बापू यांच्यात असलेल्या विलक्षण धारिष्टयाचा परिचय करून देणारे आहे. आपल्या अविवाहीत मुलीच्या

अपत्याला जन्माला येऊ द्यायचे असा निर्णय ते घेतात आणि या दोघांची पूर्ण जबाबदारी घ्यायलाही ते तयार असतात. आणि ते ही उघडपणे करण्याचे ठरवितात. कोणताही लपवाछपवी अथवा सारवा करायला त्यांची तयारी नसते. आई कधी नव्हे त्या कठोर गंभीरपणे सांगते ''दुनिया, नीट ऐक तुला कुठे तरी चटकन घेऊन जाऊन, तिथे 4–8 महिने राहून, मग परत येऊन संगळ्यांना ! '' लग्न लागलं आणि महिन्याभरात की हो जावई अपघातात गेले'', असा बहाणा करणं कठीण नाही. लोक काय ते समजतीलच ; पण निदान वरकरणी तरी अब्रु राखली असं दाखवता येईल. मी असं काही करायला तयार झालेही असते पणा तुझे वडील अशी लपवालपवी आणि सारवा करतील असा काहीच संभव नाही. अनंताचा जर पत्ता कळला असता, तर कदाचित तुझ्याशी लग्न करायला त्याला प्रवृत्त केला असता, हो, 'तो' कोण ते चार लाकांकडून आम्हाला कळलंय! पण खरं तर तेही करायला ते नाराज होते. तेव्हा एक प्रकारे तो गायब आहे हे ठीकाय. तशा बळजबरीच्या लग्नात तुला सुख लागण्याची शक्यता काय होती, नाही तरी? पण आता समजून असं.

आपण बरं की आपला अभ्यास, काम बरं. कुणाकडे जायचं–यायचं नाही, कुणात फार मिसळायचं नाही. आमच्याकडे आणि येणाऱ्या पोराकडे बघून दिवस काढायचे, आयुष्य खडतर जाईल, मायेचा ओलावा आणखी कुणाकडून पदरात पडेल का नाही कोण जाणे, पण या मुलाचा बळी न देता तेवढंच जगणं शक्य आहे.''

दुनिया म्हणते. अभ्यास–अभ्यास करून शक्य तितक्या लवकर परतण्याकडे माझे सारे लक्ष होते. खेरीज, कुणाशी मैत्री वाढवा, मग त्यांच्या प्रश्नांची उत्तरे द्या, त्यांना आपली कथा सांगा आणि कदाचित, त्यांच्यासाठी आपल्या आयुष्यात जागा करा–असल्या फंदात न पडायला मी स्वतःला, आईच्या शिकवणुकीनुसार, शिकवून टाकले होते. चटकन, घसघशीत, गळेपडू मैत्र्या करण्याचा माझा स्वभावही नव्हता. अभ्यास शक्य तितक्या लवकर संपवून, डिग्री पदरात पाडून घेऊन परतायचे, लांब कुठे तरी नोकरी पत्करून, मणीला घेऊन आमचे दोघींचे घर थाटायचे, अशी काहीशी स्वप्ने होती.

त्यावेळी परदेशात एवढे भारतीय विद्यार्थी पसरलेले नव्हते ; दुनिया ज्या विद्यापीठात पी.एच.डी. करत असते. तेथील भारतीय विद्यार्थी एक संमेलन भरवतात. विद्यार्थिनींने उत्साहाने बनवलेल्या 'भारतीय' जेवणाची बशी घेऊन उभी असते. त्यावेळी दयाल तिला विचारतो इथं काय करताय ? तेव्हा ती ''पुरातत्वशास्त्रात प्रबंध लिहितेय'' असं उत्तर देते. दयालही आपण न्युरोसर्जरीची काही नवी तंत्रे शिकतोय ही माहिती न विचारताच सांगतो.

दयालच्या काळ्या सरळ केसात एक पांढरीशुभ्र बट मात्र उजव्या कानापासून मागे गेली होती. दुनिया म्हणते ''तुमचं नाव तुम्हाला शोभुन दिसतं या पांढऱ्या बटीमुळे !''

त्यावर दयाल हसत म्हणाला ''गंमतच आहे ती, मला अगदी जन्मापासून होती ही बट म्हणून आईनं तशा रंगाच्या पक्षांचे हे नाव दिलं पण तुम्हाला कसं काय बुवा माहितेय या पक्षाबद्दल ? बहुतेक लोकांना वाटतं, मी दयाळू स्वभावाचा आहे म्हणून मला हे नाव मिळालं!''

दुनिया परत दयालशी सांगते ''माझे वडील प्राणिशास्त्रज्ञ आहेत. पक्षांचा विशेष अभ्यास आहे त्यांचा''. ''पक्षी–निरीक्षणातले सलीम अलींचे सहकारी होते.'' नंतर तो तिला भेटत राहतो लग्न करण्याचा आपला बेत बोलून दाखवतो. दुनियाही दयालपासून काहीच लपवून ठेवत नाही. आपल्या कुटुंबाला भेटण्याला सल्ला देते.

दुनिया आणि दयाल लग्न करायचे ठरवतात. अर्थात आई–बापू मणी जमना–सखाराम याची संमती घेऊनच त्यावेळी दुनिया पुरूषाबद्दलचा विचार बोलून दाखवते.''स्वतःचा म्हणता येईल असा पुरूष जवळ असणं ही चैन ! आणि जगात कित्येक लाखांनी बायका जबर किंमत भरूनही आपल्या पुरूषाला का चिकटून राहतात,का त्यांच्या शोधात असतात ते नसले तर का स्वतः वंचित समजतात हे मला स्वच्छ उमजले. ''असा विचार दुनिया बोलून दाखवते.

मणी आणि जब्बार यांचे परस्परांवर प्रेम असते. 'तर्कशुध्द' विचाराला भगवान मानणाऱ्या आजोबांनी जन्मापासून वाढवलेली मणी आणि दयालला भेटली तेव्हा सातेक वर्षाची होती. दयालही 'तर्कशुध्द' विचाराचा आहे. त्या दोघांच्या विचारसरणीत वाढलेली मणी.

मणीने जब्बारशी लग्न ठरवल्यावर सहज एकदा दुनिया म्हणते ''मणी, अर्णवशीच लग्न करशीलंसं वाटलं होतं! तर डोळे मिचकावून म्हणावली, ''आई, अर्णव मला फार आवडतो. आय लव्ह हिम! बट ही इज नॉट सेक्सी!'' असं मणी आपला विचार बोलुन दाखवते.

अर्णवचा गोल गुबगुबीत देह, बाळासारखा निरागस चेहरा, लांब केसांची वेणी आणि बसल्या जागेवरून जे काय हाताशी लागेल ते फन्ना करणारे तोंड आठवून दुनिया हसते. दुनिया सांगते भाषांवर प्रभुत्व, चित्रकला, गाण्यातले सखोल ज्ञान, तल्लख बुध्दी, लोकांशी जमवून घेणारा मनमिळावूपणा .. जगात नाव–पैसा करायची एक जिद्द तेवढी नाही ; आपल्या तरीक्याने जे जमेल ते जमेल. मणी यालाच'' नॉट सेक्सी'' म्हणते, आणि तिच्या बापाची आठवण येऊन दुनियाच्या मनात अर्णवसाठी चरकते ते, अनंता सारखा तोही एक दिवस नाहीसा होणार की काय, या भीतीने. मणी खरेच माझ्याहून शहाणी. आपल्या जोडीदाराबद्दल मणी स्वतः निर्णय जब्बारबद्दल घेते. मणीला जब्बार भेटला, आवडला, जब्बार एका जाहिरात एजन्सीचा आर्ट डायरेक्टर आहे.

कटकटींना ताणांना सुरूवात तिच्या लग्नाच्या प्रस्तावापासून झाली होती. नजरेआड करायची फुरसद नसावी इतक्या लख्खपणे दुनियेला दिसले होते, मणीला लग्न करायचे नव्हते 'नुसता' संसार थाटायचा होता. तिने तसे करावे याला दयालची संमती होती. नेहमीच्या तर्कशुध्द खाक्यात तिने जेव्हा विचारले, ''कशाला लग्न करायच? मला मुलंबाळं नकोत, लौकीकाला काय जो धक्का बसेल, त्यानं माझं काही वाकडं होणार नाहीये, पैशासाठी मी जब्बारवर अवलंबून नाही ; पैशासाठी मी जब्बारवर अवलंबून नाही ; मग हे उपचारच करण्यात काय अर्थ ? विशेषत : ते मान्य नसताना ?''

मणीने लग्न करायलाच हवे असे काही दुनियाला वाटत नव्हते; पण एकमेकांबरोबर संसार थाटाचा, तर का करू नये, असेपण वाटत होते. दुनियाची द्विधा मनस्थिती झाल्याचे दिसून येते. दुनिया म्हणते इतकी वर्षे, इतकी लग्ने पाहिल्यावर मणीचे पटत होते, की लग्न संस्थेत संस्था म्हणून तरी काही अर्थ नाही ; पण तिला फारसे ठाम, स्वीकारणीय दुसरे पर्यायही अजून तरी दिसत नव्हते. खूप दिवस चालले होते ते वाद आणि चर्वितचर्वण.

जब्बारच्या आग्रहानुसार अखेर मणी–जब्बारचे लग्न होते. लग्नानंतर त्याला मूल हवं असतं. मूल नको हे मणीचं मत अनैसर्गीक आहे असे त्याला वाटते. दयालने मणीला ''डार्लिंग म्हणल्याने जब्बार म्हणतो. ''तुझे वडिल तुला नेहमी डार्लिंग म्हणतात?'' असा प्रश्न विचारतो त्यावर मणी म्हणाली'' नाही. खेरीज, स्वीटहाअर्ट, डीअरेस्ट, सोनुली, भावली, मणुली, माझुली असं काय काय पण म्हणतात.''

परत जब्बार दुनियाजवळ विचारतो'', ''फार सख्य दिसतं या बापलेकीचं!'' आपल्याला नातवंडं असावीत असं नाही वाटत तुम्हांला ?

जब्बारच्या अनैसर्गीकतेचा प्रश्न उपस्थित केल्यावर दयाल जब्बारला उत्तर देतो'' आपण हे कपडे घातले, ते अनैसर्गीक नाहीत का, आणि शिजवलेलं जेवण जेवतोय, या चार भिंतीत राहतोय, तेही ? मी आणि मणी लोकांची चीरफाड करून त्यांना दुरूस्त करतो तेही ? अगदी डोके दुखतं म्हणून तू ॲस्पिरिन घेतोसे ? जे काय सोयीचं आहे, ते नैसर्गीक म्हणून स्वीकारायचं, आणि जे खकटतं ते अनैसर्गिक' म्हणून वाद करायला बघायचं, हे चालणार नाही जब्बार!'' अशी समज देतो.

दुनियाची मैत्रिण अभया म्हणते ''मग माझी सांगते. तुला ऐकायला बरं वाटेल की नाही. कुणास ठाऊक. पण ऐक तू सोडता आम्हां सगळयांना ठाऊक होतं, की हे लग्न मोडणार, अर्णव – तीर्थकरनी तर पैजा घेतल्या होत्या महिन्यांच्या ''परत अभय म्हणते'' मणी चार लोकांसारखी नाही. ध्यानात ठेव.'' जब्बार ही मणीबद्दल अक्करमाशी, अनौरस, वांझोटी, लफंग्याची मुलगी, अनितीमान आईची लेक म्हणून त्याला नको असते.'' नुसत्या डोक्यावर चढवून ठेवलेल्या लाडवलेल्या मुली! काय, समाजात काय स्वतःला? कडू त्या कडू आणि वर ही मिजास!'' तिर्थकर मणी किंवा अर्णव व मणी यांचे एकमेकावरील जब्बाचं दुखणं आहे. शेवटी जब्बार आणि मणीचे लग्न मोडकळीस येण्याच्या स्थितीत येते. आणि आपल्या दयाल आणि आईकडे माहेरी येऊन राहते. आणि आपला डॉक्टरकीच्या व्यवसायात मग्न होते.

अभयाचा मुलगा तिर्थंकर हर माणीपेक्षा दहा वर्षांनी लहान असतो. तो मणीच्या प्रेमात पडतो. दुनियाला वाटते अर्णव सतीने त्याची समजूत काढावी. पण तो कोणाचे ऐकत नाही असं सांगतात. बाहेरगावी शिक्षणासाठी हॉस्टेलला राहतो. सुट्टयालागल्या नंतर घरी येतो तो मणीचा ध्यास घेऊनच तेव्हा. मणीच त्याला समजाऊन सांगते.

मणी तिर्थकरला म्हणते ''फार गहन काही नाही. नुसतं म्हणलं, ऐक तीर्थकर आय, लव्ह यू. पण माझं तुझ्यावर तू अपेक्षितोस, म्हणतोस ते 'प्रेम' नाही. आणि म्हणून मी तुझ्याबरोबर सारं आयुष्य गुंफायला तयार नाही. ही बाबही तुझ्या, माझ्यावरच्या प्रेमाइतकीच महत्वाची आहे. माझ्यावर प्रेम करायंच तुला जसं स्वातंत्र्य आहे, तसंच

तुझ्यावर अमुकच प्रकारचं 'प्रेम' न करण्याचं तू मला द्यायला पाहिजेस. क्षणभर चमकला, पण मग मानलंन. हुशार आहे तो आई – बघ कुठे जाऊन पोचतो ते!'' पुढे तो शिक्षणासाठी नोकरीनिमित्त बाहेर परदेशात राहिला नावलौकक मिळविला गावाकडे, घराकडे क्वचितच येणं होत असे.

अर्णवही मणीवर वाच्यता न करता प्रेम करत असतो. लहानपणापासूनच एकत्र वाढलेले, राहिलेले असतात. दोघांत निखळ मैत्री असते. अनंत हा मणीचा जोडीदार म्हणून त्याच्याकडे पाहत असतो. अर्णव हा अभयाचा मुलगा आहे. तो चित्रकार आहे. अनंताच्या कवितांचे भाषांतर करतो. सती ही अभयाची मुलगी असून तिला दोन मुले आहेत आपला संसार आणि मुलं यातच ती रमल्याचे दिसून येते.

तीस पस्तीस वर्षानंतर अनंत परत एक पत्र दुनियाला पाठवतो. डोक्यामध्ये ब्रेनटुमर झाल्याने स्वतःला बरेवाईट होण्याअगोदर दुनियाला भेटण्याची ईच्छा व्यक्त करतो. त्याच्या पत्राला उत्तर म्हणून दुनिया त्याला बोलावून घेते. दयालही मोठया मनाने त्याचा स्विकार करतो. मणी आणि दयाल त्याच्या ब्रेनटयुमरवर उपचार करतात. त्याला बोर्हेजच्या कविता आवडत असतात. त्याच्या तोंडून बाहेर पडलेल्या कवितांचे भाषांतर अर्णव करतो. दयालही तर्कशुध्द विचाराचा उच्चशिक्षित असून दुनियाची सर्व हकीकत समजून घेतो तिचा आनंदाने स्वीकार करतो. मणीचा बाप म्हणून सांभाळ करतो. शेवटच्या टप्यात दुनियाचा मित्र अनंत याच्यावरही सर्जरी करतो. दयालला स्वतःचे कुटुंब नसते. दुनियाचे रेडीमेड कुटुंब त्याला मिळते. दुनियाच्या, मणीच्या, आई बापूच्या विश्वासाला कुठेही तडा जाऊ देत नाही. दयाल माणूस म्हणून छान आहे.

अभया ही दुनियाची मैत्रीण दोघीही विद्यापीठात प्राध्यापक म्हणून नोकरीला असतात. एकमेकींच्या सुख दुखःत समाविष्ट असणाऱ्या दोघीची मुल एकमेकीच्या घरामध्ये वावरतात जणु एक मोठं कुंटूबच. दुनियाच्या प्रत्येक चर्चेमध्ये सहभागी असणारी तिची मैत्रीण अभया खासच लक्षात राहते.

उत्खनन कादंबरीचे विशेष/गौरी देशपांडे यांच्या साहित्याचे विशेष

स्त्रियांचे माणुसपणाचे हक्क संपवीणारी संस्था म्हणजे विवाहसंस्था या विवाहसंस्थेविषयीचे अनेक प्रश्न त्यांच्या साहित्यात निर्माण होतात. एकंदरीत स्त्री स्वातंत्र्याच्या प्रखर पुरस्कर्त्या म्हणून गौरी देशपांडे आणि त्यांच्या साहित्याकडे बघता येते. भांडवलशाही व्यवस्थेत बदलते नातेसंबंध त्याचा स्त्रीयाच्या मनोधारणेवर झालेला परिणाम यांचे प्रभावी चित्रण गौरी देशपांडे करतात. अधुनिक स्त्रीयांची घुसमट आणि या घुसमटीतून बाहेर येऊन माणूस म्हणून जगण्यासाठी केलेली धडपड यांचे चित्रण करतात. स्त्रीचे म्हणून मानवीकरण करण्याची प्रक्रीया गौरी देशपांडे यांच्या कादंबरीतून सहजपणे अभिव्यक्त होते. आयुष्याशी प्रमाणीक असलेल्या आणि स्त्री म्हणून जगताना मनात येणारी प्रत्येक मानसीक, शारीरिक भावना स्पष्टपणे मांडणाऱ्या नाईका गौरी देशपांडे यांनी पुढे आणल्या गौरी देशपांडे ज्या वातावरणात राहिल्या त्या वातावरणातील प्रतिमा त्यांनी रंगविल्या. स्त्रीयामधील माणूसपणाचे भान जागृत करणारे आहेत. स्त्री आणि पुरूष दोघाच्याही सगळयाच भावानेने न पाहता निखळ मानवी देह पाहण्याचा आग्रह धरतात. स्त्रीच्या देहाभोवती नौतीकतेचे निकष तोडायला सुरूवात केली. पुरूषप्रधान व्यवस्थेत स्त्रीने स्वतःच्या लैंगिक सुखाबद्दलचे वाटणारे अपराधीत्व बाजूला सारावे असा आग्रह धरला. स्त्रीयांच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. पण हा पुरस्कार करताना त्यांच्या नायिका कधीही उथळ,चंचल वाटत नाही. स्त्री या स्वंतत्र व्यक्तिमत्वाच्या, जबाबदारीची जाणीव असलेल्या वर्णन करतात. त्यांच्या स्त्रीया निरपेक्ष आणि निकोप जीवन पध्दतीच्या शोधात आहेत असे वाटते. उत्खनन कांदबंरी मध्ये प्रामख्याने स्त्री पूरूष संबंधावर भर आहे. स्त्री म्हणून जगाशी येणारे संबंधाशी वर्णन आहे. गौरी देशपांडे यांचे साहित्य 1970 ते 2002 या काळात प्रसिध्द झाले आहे. भारतीय स्त्री जीवनात झालेली स्थित्यंतरे त्यांनी अत्यंत धिटपणे आपल्या कांदबंऱ्यामधून मांडली. या 60 वर्षात भारतीय पारंपरिक मुल्याची झालेली पडझड, भांडवलशाही जागतीकीकरण या सर्वाचा परिणाम भारतीय स्त्री जीवनावर कसा झाला याचा आढावा गौरी देशपांडे यांनी आपल्या लघु कांदबऱ्यामध्ये घेतला आहे. एकंदरीत 1970 ते 2002 हा काळ नव अधुनिक जाणीवांचा काळ आहे.

संदर्भ ग्रंथ

भागवत विद्युत : स्त्री वादी सामाजिक विचार
डायमंड पब्लिकेशन पुणे प्रथम अवृती 2008
म्हाजन वंदना : स्त्रीवाद आणि मराठी साहित्य

विजय प्रकाशन, नागपूर
प्रथमावृती 1 नोव्हेबंर 2013
देशपांडे गौरी : उत्खनन
मौज प्रकाशन गृह, मुंबई.
प्रथमावृती मे.2002
लांडे समुती : स्त्रीवादी संपादन
पृष्ठ 13
पाटील शोभा : स्त्रीवादी विचार आणि समिक्षेच्या मागोवा
स्नेहवर्धन प्रकाश पृष्ठ 37
धोंगडे अश्विनी : स्त्रीवादी समिक्षा स्वरूप आणि उपयोजन दिलीपराज
प्रकाशन पुणे. प्रथमावृती 31 जानेवारी 1993

LBP PUBLICATION